दैनिक

# अदिती एक्सप्रेस

❍ दि. १८ फेब्रुवारी २०२६
❍ बुधवार
❍ वर्ष ४ थे
❍ अंक १०५
❍ किंमत २ रूपये
❍ पृष्ठे ४
❍ लातूर
❍ RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे   उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे   ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in


### आजचे पंचाग

❍ दिनांक : १८ फेब्रुवारी २०२६
❍ वार : बुधवार
❍ माह (अमावस्यांत) : फाल्गुन
❍ माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
❍ ऋतु : शिशिर
❍ आयन : उत्तरायण
❍ पक्ष : शुक्ल पक्ष
❍ तिथी : प्रथम तिथी (सायंकाळी ०४:५७ पर्यंत) त्यानंतर द्वितीया तिथी
❍ नक्षत्र : शततारका नक्षत्र (रात्री ०९:१५ पर्यंत) त्यानंतर पूर्वाभाद्रपदा नक्षत्र
❍ योग : शिवा योग (रात्री १०:४४ पर्यंत) त्यानंतर सिद्ध योग
❍ करण : भाव करण (सायंकाळी ०४:५७ पर्यंत) त्यानंतर बलवा क रण
❍ चंद्र राशी : कुंभ राशी
❍ सूर्य राशी : कुंभ राशी
❍ अशुभ मुहूर्त:
❍ राहु काळ : दुपारी १२:५३ ते दुपारी ०२:१९ पर्यंत
❍ सूर्योदय : सकाळी ०७:०६
❍ सूर्यास्त : सायंकाळी ०६:३९
❍ संवत्सर : विश्वावसु
❍ संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
❍ विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
❍ शक संवत: १९४७ शक संवत

## इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'चा उद्देश हा सर्वांच्या हितासाठीच - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली: दिल्ली येथे आयोजित पाच दिवसीय इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६च्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की या शिखर परिषदेचा उद्देश कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर सर्वांच्या हितासाठी कसा करता येईल हे शोधणे आहे.

पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये लिहिले, बुद्धिमत्ता, तर्कशुद्धता आणि निर्णयक्षमता विज्ञान व तंत्रज्ञानाला जनतेसाठी उपयुक्त बनवतात. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटचा उद्देश एआयचा उपयोग सर्वांच्या फायद्यासाठी कसा करता येईल हे शोधणे हा देखील आहे.

अनेक मान्यवर एकाच व्यासपीठावर उपस्थित होणार:




१६ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या परिषदेच्या माध्यमातून राष्ट्रप्रमुख, सरकारप्रमुख, मंत्री, जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, प्रख्यात संशोधक, बहुपक्षीय संस्थांचे प्रतिनिधी आणि उद्योगक्षेत्रातील हितधारक एकाच व्यासपीठावर आले आहेत. समावेशक विकासाला चालना देणे, सार्वजनिक यंत्रणा बळकट करणे आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी एआयची भूमिका काय असू शकते यावर चर्चा करणे हा यामागील उद्देश आहे. या विषयावर इतक्या मोठ्या प्रमाणात जागतिक परिषद 'ग्लोबल साऊथ'मध्ये आयोजित होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

२० फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या पाच दिवसीय परिषदेत १०० हून अधिक सरकारी प्रतिनिधी सहभागी झाले आहेत, (पान २ वर)

## एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच

### नवीन सीसीटीव्ही प्रकल्पातून प्रवाशांना मिळणार अभेद्य संरक्षण

मुंबई: राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. दहशतवादी आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्यांचा विचार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) एक महत्त्वाकांक्षी 'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्वच महत्त्वाच्या ठिकाणांवर डिजिटल नजरेचे अभेद्य जाळे उभारले जाणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च



प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पासाठी तब्बल १११ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीच्या सहाय्याने एसटीच्या बसस्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यांसारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, यामुळे एसटीच्या प्रत्येक हालचालीवर सतत डिजिटल नजर राहणार आहे.

या अत्याधुनिक प्रकल्पाची जबाबदारी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या टेलिकम्युनिकेशन कन्सल्टंट इंडिया लिमिटेड या अनुभवी संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. (पान २ वर)

### नाशिक-कळवण मार्गावर दोन कारची धडक; सात जण गंभीर जखमी

नाशिक: सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी वणीगडाकडे जाणाऱ्या भाविकांच्या कारला नाशिक-कळवण मार्गावर भीषण अपघाताचा सामना करावा लागला आहे. दोन कारची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने झालेल्या या अपघातात दोन्ही वाहनांतील ६ ते ७ जण गंभीर जखमी झाले आहेत.

हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही गाड्यांच्या समोरील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. अपघाताचा मोठा आवाज होताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गाड्यांमध्ये अडकलेल्या जखमींना नागरिकांनी मोठ्या शर्थीने बाहेर काढले.

जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने रुग्णवाहिकेने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. भररस्त्यात दोन गाड्या एकमेकांना धडकल्याने नाशिक-कळवण मार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्त वाहने बाजूला सारली आणि वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले.

सध्या वणीगडावर भाविकांची मोठी गर्दी होत असून, घाटातील आणि महामार्गावरील वाहतूक वाढली आहे.

(पान २ वर)

## अल्पसंख्याक प्रमाणपत्र घोटाळ्यात मंत्रालयातील उपसचिव रडारवर - अनियमितता करणाऱ्यांची गय नाही

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले कठोर कारवाईचे संकेत

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यावर शोककळा पसरलेली असताना, मंत्रालयातील अल्पसंख्याक विभागाने ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक प्रमाणपत्र देण्याचा प्रताप केला. त्याची राज्य सरकारने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये मंत्रालयातील एका उपसचिवाचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ज्यांनी कोणी या प्रक्रियेत अनियमितता किंवा गडबड केली असेल, त्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी दिला.



२८ जानेवारी रोजी अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. संपूर्ण राज्य या धक्क्यातून सावरत असतानाच, अल्पसंख्याक विकास विभागाने मागील ऑगस्टपासून प्रलंबित असलेली ७५ प्रमाणपत्रे अवघ्या काही तासांत वितरित केली. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने मुख्यमंत्र्यांनी या प्रमाणपत्रांना तात्काळ स्थगिती दिली असून दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

हवामान बदलाचा सामना करण्यासाठी 'मुंबई सज्ज'

मुंबईत मंगळवारपासून देशातील पहिली 'मुंबई क्लायमेट वीक' परिषद जिओ वर्ल्ड सेंटर येथे सुरू झाली. महाराष्ट्र शासन आणि मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचे (पान २ वर)

## मी तुलना केलीच नव्हती मात्र...अखेर शिवरायांच्या अपमानावरून हर्षवर्धन सपकाळांची माफी

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करण्याच्या धाडसामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळल्यानंतर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना अखेर नमते घ्यावे लागले आहे. भारतीय जनता पक्षाने पुकारलेल्या राज्यव्यापी एल्गारानंतर आणि शिवप्रेमींच्या तीव्र आंदोलनासमोर सपकाळ यांनी हात जोडत आपली दिलगिरी व्यक्त केली. ज्यांच्या भावना दुखावल्या असतील, त्यांच्याप्रती मी दिलगिरी व्यक्त करतो, असे म्हणत सपकाळ यांनी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

भाजपचा आक्रमक पवित्रा आणि सपकाळांची सारवासारव



काँग्रेसने नेहमीच तुष्टीकरणाचे राजकारण केल्याचा आरोप भाजपने केला आहे. टिपू सुलतानसारख्या वादग्रस्त व्यक्तीचा आदर्श छत्रपती शिवरायांशी जोडणे, हा केवळ महाराजांचा अपमान नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेवर केलेला घाला आहे, अशी भूमिका भाजपने मांडली. भाजपच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात आणि इतर शहरांत रस्त्यावर उतरून सपकाळ यांच्या पुतळ्याचे दहन केले होते. या वाढत्या दबावामुळे सपकाळ यांनी स्पष्टीकरण दिले की, मी तुलना केलीच नव्हती, माझ्या शब्दांचा विपर्यास करण्यात आला. मात्र, भाजपने याला काँग्रेसची नेहमीची 'यु-टर्न' घेण्याची पद्धत म्हटले आहे.

टिपू सुलतानांचे उदात्तीकरण खपवून घेणार नाही

(पान २ वर)

## माटेगडी येथे शिवजयंती निमित्त शामराव लवांडे यांचे व्याख्यान

दै. अदिती एक्सप्रेस

वलांडी: महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त देवणी तालुक्यातील हिसामनगर ( माटेगडी) येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने सुप्रसिद्ध शिवव्याख्याते शिवश्री शामराव लवांडे यांचे छत्रपती शिवाजी महाराज आणि आजची युवा पिढी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान बुधवार, दिनांक, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०७ : ३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्याच्या परिसरात होणार आहे.



शिवव्याख्याते शिवश्री शामराव लवांडे हे लातूर येथील सरस्वती विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख व राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त एक उपक्रमशील शिक्षक असून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि आजची युवा पिढी या विषयावरती महाराष्ट्रभर अनेक व्याख्याने दिली आहेत.

(पान २ वर)

## श्री खंडेरायाचा हळदी व विवाह सोहळा उत्साहात

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि.१७- महाकाल प्रतिष्ठान, लातूर यांच्या वतीने व रामलिंगेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ फेब्रुवारी रोजी श्री खंडेरायाचा हळदी सोहळा तर १५ फेब्रुवारी रोजी भव्य विवाह सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याने लातूर शहरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.



गावभागात अति श्रद्धेने पूजले जाणारे बाबा महाकाल हे नगर भ्रमणासाठी वर्षातून केवळ महाशिवरात्रीच्या दिवशीच बाहेर आणले जातात. या दिवशी निघणाऱ्या पालखी सोहळ्याचे गावभागातील नागरिक मोठ्या भक्तिभावाने स्वागत करतात. जणू महाकाल महाराज आपल्या प्रजेच्या हालचाली जाणून घेण्यासाठी आले आहेत, अशा भावनेने नागरिक पालखीचे स्वागत करत दिवाळीप्रमाणे उत्सव साजरा करतात. घराघरांत रांगोळ्या, फुलांची उधळण, दीपप्रज्वलन आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो.

यंदाच्या वर्षीही लातूरकरांसाठी ही पर्वणी विशेष उत्साहात साजरी करण्यात आली. पालखी मार्गक्रमण सोहळ्याची सुरुवात लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास अधिक प्रतिष्ठा लाभली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी अशा सोहळ्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

हळदी व विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, डमरू-ताशांचा गजर, वेदमंत्रांचे उच्चारण, फुलांची आकर्षक सजावट आणि भक्तिमय वातावरण यामुळे (पान २ वर)

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'विशेष टपाल तिकीट' जारी करा

मुंबई: वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून, 'विशेष टपाल तिकीट' जारी करण्याची मागणी शिवसेनेचे राष्ट्रीय सरचिटणीस, माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना शेवाळे यांनी दिलेल्या लेखी निवेदनाबाबत केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे.



आपल्या निवेदनात शेवाळे यांनी हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक आणि राजकीय योगदानाचा उल्लेख केला आहे. १९६० च्या दशकापासून पुढची ५० वर्षे बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रासह देशभरातील राजकीय पटलावर महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एक हिंदुत्ववादी लोकनेता, महान व्यंगचित्रकार, श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा वक्ता अशा विविध रूपांत बाळासाहेबांनी नेहमीच आपली भूमिका परखडपणे मांडली. त्यांची लेखणी, त्यांची भाषणे आणि त्यांच्या व्यंगचित्रांच्या माध्यमातून त्यांनी सामान्य माणसाच्या मनात स्वाभिमानाचे स्फुल्लिंग जागविले, असेही शेवाळे यांनी निवेदनात लिहिले आहे.

(पान २ वर)

## भूकंपामुळे इमारत कोसळली; जखमींना तातडीने मदत मिळाली

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर,- : जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आज सकाळी साडेअकरा वाजता मोठा आवाज झाला. भूकंपाच्या धक्क्याने येथील इमारत कोसळल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला या घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून स्थानिक अग्निशमन पथक, आपदा मित्रांचे शोध व बचाव पथक तसेच रुग्णवाहिका आणि आरोग्य पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. हा प्रसंग जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूकंप विषयक आपत्ती व्यवस्थापनाच्या रंगीत तालमीचा होता.



जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे, औसा-रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, पुणे येथील एनडीआरएफचे सहाय्यक कमांडंट गौरव जांकटे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

भूकंपामुळे दुमजली इमारत कोसळल्याची माहिती मिळताच पोलीस नियंत्रण लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला आणि आरोग्य विभागालाही तात्काळ सूचित करण्यात आले. पोलीस पथक, अग्निशमन वाहन, होमगार्ड, रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक, आपदा मित्र हे काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. 'इन्सीडंट रेस्पॉन्स सिस्टम' (आयआरएस) नुसार इन्सीडंट कमांडर, ऑपरेशनल चीफ, लायझन ऑफिसर, इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर प्रभारी, जनसंपर्क अधिकारी यांनी त्वरित जबाबदाऱ्या पार पाडल्या. घटनास्थळी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आणि इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर कार्यान्वित झाले.

पोलिसांनी परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले. पोलीस, आपदा मित्र आणि अग्निशमन दलाने जखमींचा शोध घेऊन त्यांना वैद्यकीय पथकाकडे पाठवण्यास सुरुवात केली.

(पान २ वर)

## अक्षरनंदन व एसजीपी इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील अक्षरनंदन प्राथमिक विद्यालय व एसजीपी इंटरनॅशनल स्कूल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी कातळे नगर येथील नंदादीप विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन जिल्हा परिषद सदस्या योगिता उमाकांत जाधव, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा या वर्षीचे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. उमाकांत जाधव, गांधी चौक पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते उपस्थित होते.



याप्रसंगी व्यासपीठावर संस्था सचिव कालिदास माने, अध्यक्ष भागवतराव माने, कोषाध्यक्ष सुरेखाताई माने, प्रकाश माने, प्रकाश जाधव, प्रशासकीय अधिकारी उषा आडे व नागोराव कांबळे मुख्याध्यापिका स्मिता भोसले उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर नूतन जिल्हा परिषद सदस्य योगिता उमाकांत जाधव, डॉक्टर उमाकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव कालिदास माने यांनी केल तर आभार मुख्याध्यापिका स्मिता भोसले यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे, मीनाक्षी यादव व शिवकांत मुर्गे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

# माऊली शैक्षणिक संकुल चे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



लातूर / प्रतिनिधी- येथील आंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल , लातूरचे स्नेहसंमेलन दि.१५/०२/२६ वार रविवार रोजी विश्व पॅलेस या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले.

या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. श्री चंद्रकांतजी साळुंके -'संचालक सरस्वती विद्यालय ,लातूर' यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विश्व पॅलेस चे संचालक मा. श्री.विश्वनाथ जी म्हेत्रे साहेब हे होते. मान्यवरांचे स्वागत कोषाध्यक्ष श्री. तानाजी बेवनाळे पाटील व प्रा. श्री उमेश जी गिरवलकर यांच्या हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव श्री. गंगाधर आरडले यांनी केले. या स्नेहसंमेलनात बालवाडी विभाग ते नववी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट अशी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्नेहसंमेलनात आदिवासी नृत्य ,बंगाली नृत्य, महाकाली रक्तबीज वध, या आकर्षक नृत्यांच्या सादरीकरणाने सर्व प्रेक्षक भारावून गेले. तसेच या स्नेहसंमेलनात नरसिम्हा हिरण्यकश्यपू वध हे नाट्यमय सादरीकरण उल्लेखनीय ठरले. स्नेहसंमेलनाच्या शेवटी 'ऑपरेशन सिंदूर' हे देशभक्तीपर नृत्य अंगावर शहारे आणणारे ठरले. या स्नेहसंमेलनासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. कविता आरडले मॅडम,मुख्याध्यापक श्री प्रकाश तुगावे, श्री.रजनीकांत येरमे, श्री. प्रकाश राठोड, उपप्राचार्य श्री. राम दावणकर उपस्थित होते. स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी केले, व आभार विद्यालयाच्या उपप्रचार्या काळे भाग्यश्री यांनी मानले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे व संस्थेच्या सृजशशील उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले ,सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.



# सिध्देश्वर यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन

लातूर/प्रतिनिधी : श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सव पार पडत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गतच यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम व देवस्थानचे प्रशासकीय अधिकारी सचिन जांबूतकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सिध्देश्वर यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व म नोरंजनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर शेतकत्तयांसाठी विविध उपक्रम ही या यात्रेदरम्यान राबविण्यात येतात. जिल्हा कृषी विभागाच्या वतीने या यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून यात्रा परिसरात शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाची उभारणा करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज मंगळवार दि. १७ रोजी करण्यात आले आहे. हा उद्घाटन सोहळा जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, उपाधिक्षक सूर्यकांत लोखंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, कृषी अधिकारी आर. आर. येवले, विशाल झांबरे, अजित देशमुख, विनायक बारबोले, महादेव घुले अमोल बनसोडे यांची उपस्थित होती.

या माहिती कक्षाच्या म ाध्यमातून आधुनिक शेती तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी राबविण्यात येणारे नवनविन प्रयोग याबाबत माहिती शेतकत्तयांना देण्यात येणार आहे.

त्याचबरोबर कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी शेती कशी करावी याबाबतची माहिती अवगत करण्यात येणार आहे. सदर कक्ष सकाळी १० ते संध्याकाळी ६ या दरम्यान सुरु राहणार असून याठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थित राहणार आहे. या कक्षाचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकत्तयांनी घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग व देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

## इंडिया एआय...

ज्यामध्ये २० पेक्षा जास्त राष्ट्रप्रमुख तसेच ६० मंत्री व उपमंत्री यांचा समावेश आहे. याशिवाय सीईओ, संस्थापक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, सीटीओ आणि परोपकारी संस्थांचे प्रतिनिधी अशा ५०० हून अधिक जागतिक एआय क्षेत्रातील नेत्यांनी सहभाग नोंदवला आहे. १९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनपर भाषण देणार असून ते जागतिक सहकार्याची दिशा निश्चित करतील आणि एआयबाबत भारताचा दृष्टिकोन मांडतील.

## एसटीच्या...

त्यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असून, या प्रकल्पाचा एकूण कालावधी १ वर्ष निश्चित करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य कणा ठरणारे मध्यवर्ती नियंत्रण कक्ष मुंबई येथे उभारण्यात आले असून, त्याची वापरकर्ता स्वीकृती चाचणी (णढ) यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या नियंत्रण कक्षातून राज्यभरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर केंद्रीकृत पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे कोणतीही संशयास्पद हालचाल तात्काळ ओळखून आवश्यक ती कार्यवाही करता येणार आहे.

प्रकल्पाच्या पायलट टप्प्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर विभागातील ६४ महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही प्रणाली यशस्वीरित्या बसविण्यात आली आहे, ज्यामुळे सुरक्षेची नवी दिशा निश्चित झाली आहे. उर्वरित २७ विभाग, तसेच विविध कार्यशाळा आणि कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची पुढील कार्यवाही सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे एसटीच्या बसस्थानकांवर आणि कार्यालयांमध्ये सुरक्षिततेचे नवे पर्व सुरू होणार आहे. प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होणार असून, कोणत्याही अनुचित घटनांवर त्वरित नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हा केवळ कॅमेरे बसविण्याचा उपक्रम नसून, तो एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच देणारा आणि प्रवाशांच्या विश्वासाला नवे बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. यामुळे 'लालपरी' चा प्रवास आता केवळ वेगवानच नव्हे, तर अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानसज्ज होणार आहे. हीच या प्रकल्पाची खरी यशोगाथा ठरणार आहे. असे मत मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले.

## अल्पसंख्याक...

उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले की, हवामान बदलाचा (क्लायमेट चेंज) सामना करताना हवेची आणि पाण्याची गुणवत्ता सुधारून 'लाईफ क्वालिटी' उत्तम करणे हे आमचे लक्ष्य आहे. ही परिषद दरवर्षी मुंबईत आयोजित केली जाईल. या परिषदेसाठी ३५ देशांतील प्रतिनिधी उपस्थित आहेत.

'ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन'चा शुभारंभ

शेती क्षेत्रावर होणारा हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी काही प्रभावी मॉडेल्स आणि स्टार्टअप्स या परिषदेत पुढे आले आहेत. याचा राज्यातील बळीराजाला मोठा फायदा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. दरम्यान, मुंबईत 'ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन' या तीन दिवसीय शिखर परिषदेचाही प्रारंभ झाला. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या परिषदेचे उद्घाटन केले. जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरता आणि नव्या पुरवठा साखळ्या निर्माण करण्याच्या दृष्टीने ही परिषद अत्यंत महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. जगभरातील मान्यवर नेते या मंचावरून पुढील तीन दिवस विचारमंथन करणार आहेत.

## मी तुलना...

सपकाळ यांनी आपल्या स्पष्टीकरणात टिपू सुलतानांचा उल्लेख संविधानातील प्रतिमेचा दाखला देत केला आणि त्यांना शिवरायांकडून प्रेरणा घेणारे म्हटले. यावर भाजप नेत्यांनी पलटवार केला आहे. हिंदूंचे दमन करणाऱ्या टिपू सुलतानाचे उदात्तीकरण करण्यासाठी शिवरायांच्या नावाचा आधार घेणे हे काँग्रेसचे दिवाळखोर वैचारिक धोरण आहे, अशी टीका भाजपकडून करण्यात आली. धर्मांतराचे आणि अत्याचाराचे समर्थन करणाऱ्या व्यक्तीची तुलना स्वराज्याच्या संस्थापकांशी करणे ही शिवद्रोहाचीच कृती असल्याचे भाजपने ठामपणे सांगितले.

धार्मिक तेढ निर्माण करण्याचा काँग्रेसचा डाव?

सपकाळ यांनी उलट भाजपवरच धार्मिक तेढ निर्माण केल्याचा आरोप केला असला, तरी भाजपने हे आरोप फेटाळून लावले आहेत. लोकांच्या भावना भडकवणारी वक्तव्ये काँग्रेसचे नेते करतात आणि जेव्हा जनता जाब विचारते, तेव्हा भाजपवर खापर फोडतात, असा टोला भाजप प्रवक्त्यांनी लगावला. अखेर जनरेटा आणि शिवप्रेमींचा रोष पाहता सपकाळ यांना माफी मागावी लागली, हा भाजपच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आणि शिवरायांच्या सन्मानाचा विजय असल्याचे मानले जात आहे.

## नाशिक-कळवण...

अशा वेळी वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आणि वळणांवर सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## माटेगडी येथे.,..

तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वर्तमानपत्रामध्ये लिखाण सुद्धा करतात.

तरी या व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील सर्व शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती हिसामनगर (माटेगडी) च्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री खंडेरायाचा...

संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. खंडेरायाच्या विवाह सोहळ्यातील प्रत्येक विधी अत्यंत पारंपरिक पद्धतीने सादर करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित भाविकांना जणू प्रत्यक्ष दैवी विवाह सोहळ्याचा अनुभव मिळाला.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे युवक वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग. महाकाल प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये सनातन धर्माचे या युगातील महत्त्व पटवून देण्यावर विशेष भर देण्यात येतो. आधुनिक युगातील वेगवान जीवनशैलीत तरुण पिढीने आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहणे, धार्मिक परंपरांचा अभिमान बाळगणे आणि समाजहितासाठी कार्य करणे किती आवश्यक आहे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

भक्तिमार्गातून निर्व्यसनी व संस्कारी जीवन कसे जगता येईल, यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. व्यसनमुक्ती, शिस्तबद्ध दिनचर्या, वडीलधाऱ्यांचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सव नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

महाकाल प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना योग्य दिशा देण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. लातूरकरांसाठी हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव ठरला.

## हिंदुहृदयसम्राट...

नुकतीच, २७ जानेवारी रोजी वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची १०० वी जयंती देशभरात मोठ्या आनंदाने साजरी करण्यात आली. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने वंदनीय बाळासाहेबांना अनोखी श्रद्धांजली द्यावी, ही देशभरातील लाखो चाहत्यांची इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र सरकारने विशेष टपाल तिकीट जारी करून यथोचित सन्मान करावा, अशी मागणी शेवाळे यांनी निवेदनातून केली आहे.

काय म्हणाले राहुल शेवाळे ?

माझ्यासारख्या लाखो शिवसैनिकांसाठी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे एक स्फूर्तीस्थान आहेत. त्यांच्या परखड हिंदुत्ववादी विचारांनी देशभरातील सामान्य माणसाला आत्मविश्वास दिला. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विशेष टपाल तिकीट जारी करून शिवसेनाप्रमुखांना अनोखी आदरांजली द्यावी, अशी मागणी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली आहे. याबाबत केंद्र सरकार सकारात्मक असून लवकरच भारतीय टपाल विभागाकडून अशा प्रकारचे विशेष टपाल तिकीट जारी केले जाईल, याची मला खात्री आहे.

## भूकंपामुळे ...

इमारतीत लागलेली आग अग्निशमन पथकाने नियंत्रणात आणली. इमारतीखाली काही जण अडकले असण्याची शक्यता लक्षात घेऊन इन्सीडंट कमांडरांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाशी (एनडीआरएफ) संपर्क साधला आणि शोध व बचाव पथक मागवले.

एनडीआरएफ पथक दाखल होण्यापूर्वी स्थानिक पथकांनी चार जखमींना उपचारासाठी रवाना केले. अजयकुमार यादव यांच्या नेतृत्वाखालील एनडीआरएफ पथकाने घटनास्थळी पोहोचून इन्सीडंट कमांडर घनश्याम अडसूळ यांच्याकडून परिस्थिती जाणून घेतली. इमारतीत आणखी आठ जण अडकले असल्याचे समजताच त्यांनी शोध कार्य सुरू केले. मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांची सुटका करून त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले. इतर व्यक्तीचा ठावठिकाणा समजत नसल्याने एनडीआरएफच्या प्रशिक्षित श्वान पथकाची मदत घेण्यात आली. श्वानाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एका व्यक्तीचे ठिकाण शोधून दिले. विविध साधनांचा वापर करून बेशुद्धावस्थेतील गंभीर जखमीला बाहेर काढण्यात आले आणि त्यालाही रुग्णवाहिकेतून उपचारासाठी पाठवले.

भूकंपग्रस्त इमारतीच्या लगत असलेल्या एका बसमध्ये एक व्यक्ती अडकल्याची माहिती मिळताच ऑपरेशनल चीफने एनडीआरएफ पथकाला सूचना दिल्या. कटिंग टीम आणि व्हीएलएस उपकरणांच्या सहाय्याने त्या व्यक्तीची सुखरूप सुटका करण्यात आली. श्वान पथकाच्या मदतीने तपासणी करून इमारतीत आणखी कोणी अडकले नसल्याची खात्री पटल्यानंतर इन्सीडंट कमांडरांनी शोध व बचाव मोहीम थांबवल्याची घोषणा केली.

भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी सर्व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधणे, त्यांची क्षमता वाढवणे यासाठी ही रंगीत तालिम आयोजित करण्यात आली होती. सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली आणि जखमींना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी इन्सीडंट कमांडर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांनी डेप्युटी इन्सिडेंट कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ लातूर उपकेंद्राचे डॉ. प्रमोद पाटील, एम. ए. खान, महानगर गॅसचे सेफ्टी ऑफिसर अक्षय कुचेकर यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.

लायजनिंग ऑफिसर म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद कलमे, कमांड पोस्ट प्रमुख म्हणून नंदकिशोर करले, कम्युनिकेशन पोस्ट प्रमुख म्हणून श्रीमती शीतल शिंदे व श्रीराम वाघमारे, स्थानिक ऑपरेशन प्रमुख म्हणून अग्निशमन अधिकारी बापू किरण देशमुख, उदगीरचे अग्निशमन अधिकारी श्री. क्षीरसागर, अहमदपूरचे अग्निशमन अधिकारी कैलास सोनकांबळे, मेडिकल पोस्ट प्रमुख म्हणून डॉ. विशाल गरड, तसेच लॉ अँड ऑर्डर प्रमुख म्हणून पोलीस उपनिरीक्षक मुख्तार शेख यांनी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आपत्ती व्यवस्थापन विभागातील श्रीराम वाघमारे, इनायत पटेल, सय्यद गफार आणि श्रीमती आफ्रोज शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

पोलीस दल, लातूर महानगरपालिका अग्निशमन दल, आरोग्य विभाग, डायल १०८ रुग्णवाहिका, विविध महाविद्यालयांतील एनसीसी विद्यार्थी आणि आपदा मित्र यांनी या तालमीत सहभाग नोंदविला. जिल्हा क्रीडा संकुलात अत्याधुनिक शोध व बचाव साहित्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. नागरिक आणि विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घेतली.

स्थानिक बचाव पथकांसाठी लवकरच प्रशिक्षणाचे आयोजन : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थितीत स्थानिक शोध व बचाव पथकांनी उत्तम कामगिरी केली होती. भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी नागरिकांना तातडीने मदत मिळावी यासाठी स्थानिक पथकांना एनडीआरएफच्या सहकार्याने लवकरच प्रशिक्षण आयोजित केले जाईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच या रंगीत तालमीत सर्व विभागांनी चांगली कामगिरी केल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विविध पथके आणि साहित्य दालनांना भेट देऊन पाहणी केली.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# ‘आकांक्षित जिल्हा’ ही ओळख पुसण्याचा संकल्प करूया - पुजार

धाराशिव (प्रतिनिधी) – संपूर्णता अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा अर्थात संपूर्णता अभियान २.० चा शुभारंभ आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते साईन बोर्डचे अनावरण व दीप प्रज्वलन करून करण्यात आला. या अभियानाचा कालावधी २८ जानेवारी ते १४ एप्रिल २०२६ असा राहणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) देवदत्त गिरी आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी पूजार म्हणाले की, संपूर्णता अभियान २.० अंतर्गत सहा निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करून यावेळी सुवर्ण पदक मिळविण्याचा निर्धार आहे. ’आकांक्षित जिल्हा’ ही धाराशिवंची ओळख या अभियानाच्या माध्यमातून पुसून टाकायची असून त्यासाठी बरिष्ठ अधिकारी–कर्मचारी ते तळागाळातील घटकांपर्यंत सर्वांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जिल्ह्यातील ४४० ग्रामपंचायती टी.बी. मुक्त घोषित करण्यात आल्या असून संपूर्ण जिल्हा टी.बी. मुक्त करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. निती आयोगाद्वारे जानेवारी २०१८ मध्ये सुरू करण्यात आलेला ’आकांक्षित जिल्हा कार्यक्रम’ हा देशातील ११२ मागास जिल्ह्यांच्या जलद विकासासाठी राबविण्यात येणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील धाराशिव, नंदूरबार, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश आहे. आरोग्य, शिक्षण, कृषी आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांवर विशेष भर देत ४९ प्रमुख कामगिरी निर्देशांकांच्या आधारे जिल्ह्यांची प्रगती मोजली जात असल्याचे पुजार यांनी सांगितले. संपूर्णतः अभियान १.० हा टप्पा १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला होता. जिल्हास्तरावरील पाच आणि

तालुकास्तरावरील सहा मुख्य निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ ४ जुलै २०२५ रोजी परंडा येथे झाला होता. त्या वेळी विविध महिला बचतगट व ’उमेद’च्या माध्यमातून खाद्यपदार्थ व विविध वस्तूंचे स्टॉल उभारण्यात आले होते.

पहिल्या टप्प्यात जिल्ह्यास रौप्य पदक तर तालुका कार्यक्रमांतर्गत परंडा तालुक्याला कांस्य पदक मिळाले. या यशात योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व चषक देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिकः गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी विनय कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) देवदत्त गिरी, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी (परंडा) गणेश कुकडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जिल्हा अभियान व्यवस्थापक वनिता डोंगरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), परंडा तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, परंडा गट विकास अधिकारी विनोद जाधव तसेच आरोग्य विभागातील डॉ. सुषमा सांजेकर, डॉ रुपाली शिंदे, आरोग्य सेविका आशा काळे, उपकेंद्र चिंचपूर बुद्धक येथील आरोग्य सेवक संभाजी बडे, बिराप्पा कोटागोंडे, आशा गट प्रवर्तक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी मदतनीस, ग्रामसखी, कृषी सखी, प्रभाग संघ व्यवस्थापक, बैंक सखी, आर्थिक साक्षरता सखी, प्रभाग समन्वयक आणि सहायक कृषी अधिकारी यांचा समावेश होता, कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, मदतनीस व ग्रामसखी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते,



# महाशिवरात्री व शिवजयंतीनिमित्त वीरशैव लिंगायत समाजातर्फे प्रसादाचे वाटप

धाराशिव (प्रतिनिधी) महाशिवरात्री आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती या सुवर्णयोगाचे औचित्य साधून सकल वीरशैव लिंगायत समाज व मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव समिती यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाप्रसाद वाटप उपक्रम राबवण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रारंभी यावेळी मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे यांचा लिंगायत समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी महेश रामचंद्र उपासे, युवा सेनेचे जिल्हा सचिव ड. शिवयोगी चपने, भालचंद्र हुच्चे, सिद्धेश्वर नाना बेलुरे, मधुकर तावडे, अनंत जगताप, भालचंद्र कोकाटे, शिवराज कापसे, निखिल लोकरे, गौरव बागल, अमित लाटे, उत्कर्ष खळदकर, गणेश वाघमारे आदी उपस्थित होते. या

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गोपाळ केसकर, दयानंद नागापुरे, राजाभाऊ माळी, सोमनाथ बेलुरे, रवी इगवे, सतीश कुमठे, राहुल भांडवले, बबलू साळुंखे यांनी परिश्रम घेतले. यावेळी पदाधिकारी शिवभक्त व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘एमएसआरटीसी’च्या बस प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड योजना सुरू

लातूर, दि. १७ : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ने प्रवाशांना सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ’रुपे ऑन द गो, एनसीएमसी इनेबल्ड’ कार्ड योजना राज्यभरात कार्यान्वित करण्यास सुरुवात केली आहे. या कार्डद्वारे सवलतधारक (विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला इ.), विनासवलत प्रवासी आणि सामान्य प्रवासी यांना एकाच कार्डमध्ये प्रवास पास, ऑनलाइन वॉलेट आणि ऑफलाइन वॉलेट उपलब्ध होणार आहे.

हे कार्ड वैयक्तिक स्वरूपाचे असून त्यावर व्यक्तीचे नाव आणि फोटोसह माहिती अंकित असेल. हे कार्ड अहस्तांतरणीय असून सवलतीच्या तिकीटासाठी अनिवार्य राहणार आहे. कार्डची नोंदणी आणि वितरण एमएसआरटीसीच्या २५१ आगारातील अधिकृत एजंट, ३३५ वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच एनएसडीएल पेमेंट बँकेद्वारे नियुक्त होणाऱ्या ३००० पेक्षा अधिक अधिकृत एजंट यांच्यामार्फत होईल. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून नोंदणी पूर्ण झाल्यानंतर साधारण ३० दिवसांत कार्ड वितरित केले जाईल.

कार्ड मिळाल्यानंतर पीओएस यंत्राद्वारे सक्रियकरण करावे लागेल. सवलतधारक प्रवाशांना (विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक इ.) या कार्डचा लाभ मिळेल. प्रवासादरम्यान घेतलेले तिकीट सांभाळणे ही प्रवाशांची जबाबदारी राहील. राज्य परिवहन महामंडळाने या डिजिटल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी

## अधिसूचना जारी; वर्षभरात मिळणार १५ दिवसांची सूट

लातूर, दि. १७ : ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रांच्या वापराबाबत अधिसूचना जारी केली आहे. श्रोतगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी वर्षभरात १५ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक/ध्वनिवर्धक वापरण्याची सूट देण्यात आली आहे.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा १ दिवस, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा १ दिवस, श्रीगणेश उत्सव काळात पाचवा गौरी विसर्जन, सातवा, अनंत चतुर्दशीचा आदला दिवस व अनंत चतुर्दशी असे एकूण ४ दिवस, नवरात्र उत्सव काळात अष्टमी व नवमी असे २ दिवस, दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन व दिवाळी पाडवा असे २ दिवस, ईद–ए–मिलादचा १ दिवस, ख्रिसमसचा १ दिवस आणि ३१ डिसेंबररोजी १ दिवस असे १३ दिवस आणि उर्वरित २ दिवस ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक लातूर यांच्या शिफारसीनुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने सूट देण्यात येणार आहे.

शांतता क्षेत्रासाठी ही सूट लागू राहणार नाही. अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील, असेही अधिसूचनेत नमूद आहे.

# डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुर्यवंशी तर कार्याध्यक्ष पवार



धाराशिव (प्रतिनिधी) बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या बोधिसत्व, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण सुर्यवंशी यांची तर कार्याध्यक्षपदी सुधीर रामेश्वर पवार यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत सर्वानुमते ही निवड जाहीर करण्यात आली.

मिरवणूक दि.२७ एप्रिल रोजी काढण्यात येणार आहे. समितीच्यावतीने पारंपारिक वाद्यांच्या गजरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच रक्तदान शिबिर, रुग्णांना फळे वाटप, वृक्ष लागवड, दिव्यांगांना मोफत सायकल यासह विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तर यंदा राज्यातील पारंपारिक वाद्यांचा समावेश करण्यात येणार आहे. यावेळी राजाभाऊ बागल, आबा खोत, मुकुंद घुले, सतीश कदम, लक्ष्मण माने, रवी कोरे, पांडुरंग भोसले, सुभाष पवार, नंदकुमार शेटे, इलियास मुजावर, रावसाहेब शिंगाडे, विशाल शिंगाडे, सुरेश गवळी, रिजवान शेख, राजाभाऊ कळसकर आदी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर साखर कारखान्याचे कृत्रिम बुध्दीमत्ता कार्यक्रम

धाराशिव (प्रतिनिधी) तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना सहकरातला कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करणारा महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना आज रोजी बेंबळी येथील वेलकम या मंगल कार्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना लि अरविंदनगर केशेगाव ग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे, महाराष्ट्र राज्य साखर संघ, मुंबई आणि आकाशवाणी केंद्र धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या कारखाना सहकारी क्षेत्रात दोनशे पन्नास शेतकऱ्यांच्या शेतावर सॉईल मोस्चर व हवामान केंद्र उभारणी केली असुन ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर कशा पध्दतीने करावयाचे शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.



चालु असलेल्या मोबाईल ऍप वरती पाठवलेली माहिति कशी पहायची व त्यावर आलेल्या अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी चर्चासत्र घेण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तर कार्यक्रमाच्याद्देशपर प्रस्तावना बाबासाहेब आंबेडकर मल्टीस्टेटचे चेअरमन चित्राव गोरे यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडावकर यांनी आपल्या जिल्ह्यामध्ये हा प्रयोग कारखान्याच्यावतीने पुढाकार घेऊन राबविल्याबद्दल कारखान्याचे अध्यक्ष तसेच सर्व संचालक मंडळाचे कौतुक केले. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राजकुमार मोरे यांनी नेहमीच या कारखान्याने अधुनिकतेचा वारसा पुढे चालविले बद्दल विशेष कौतुक केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अरविंद गोरे यांनी कारखान्याने येणाऱ्या अडीअडचणीवर मात करत काटकसर करुन कारखाना ज्या पध्दतीने चालवला. त्याच पध्दतीने कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करुन शेतकऱ्यांनी आपले एकरी उत्पादन वाढविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. तसेच पुणे येथील व्ही एस आय चे वैज्ञानिक अधिकारी डॉ समाधान सुरवसे व प्रकल्प समन्वयक कृत्रिम बुध्दीमत्ता ऍग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीचे तुषार जाधव यांनी चांगल्या पध्दतीने कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर कारखान्याच्यावतीने शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाऊन स्वतः चेअरमन साहेबांनी केलेल्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात हा कारखाना सहकार क्षेत्रातील एकमेव सहकारी साखर कारखाना असल्याचे आवर्जुन गौरव काढले. आभार संचालक ड निलेश बारखडे पाटील यांनी देशामध्ये सहकार क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याने एक मेगावॅट सोलार प्रकल्प राबविला आणि नावलौकिक मिळविला त्याच पध्दतीने आता महाराष्ट्रामध्ये एक नंबरला सहकारी क्षेत्रात २५० शेतकऱ्यांच्या शेतावर ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुध्दीमत्ता प्रकल्प राबवुन नावलौकिक मिळविला आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे मोठे योगदान असल्याचे नमुद केले. तसेच कारखान्याचे कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी व शेतकीचा सर्व स्टाफ महिला कर्मचारी शेतकी मदतनीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम प्रसारण अधिकारी किशोर पवार यांनी तर सूत्रसंचालन आशिष लगाडे यांनी व आभार ॲड. निलेश बारखडे बारखडे यांनी मानले. नंतर अल्पोपहार व चहापाणी झाले तसेच शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणीच्या प्रश्नावर चर्चासत्र पार पडले. या कार्यक्रमास सर्व संचालक मंडळ, ऊस उत्पादक सभासद, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. राणा पाटील तुमच्यात हिम्मत असेल तर स्वत: पत्रकार परिषदेत घ्या

## आ. सावंत यांना विनाकारण बदनाम करण्याचे षडयंत्र थांबवा

धाराशिव (प्रतिनिधी) आ.तानाजी सावंत यांनी महायुतीचा विश्वासघात केल्याचा बिनबुडाचा आरोप भाजपने केला आहे. मात्र आ राणाजगजितसिंह पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत माजी आमदार राहुल मोटे यांना मदत केली. तर नगर परिषदेमध्ये शिवसेना (ठाकरे) सह एआयएमआयएम यांची मदत घेऊन आ. सावंतांना व शिवसेनेला संपवायचे प्रयत्न केले, तर जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणुकीत शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या ठिकाणी भाजपचे उमेदवार धनुष्यबाणावर उभे केले.



निवडून आलेले दोन उमेदवारांना तुम्हाला अधिकार नसताना त्यांना सहलीवर पळून नेले आहे. तसेच भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्या नावावर प्रेस नोट पाठवून बिन बुडाचा आरोप करीत आ प्रा डॉ तानाजी सावंत यांना बदनाम करण्याचे षडयंत्र थांबवा, जर तुमच्यात हिंमत असेल पत्रकार परिषद घ्यावी, प्रसिद्धी पत्रक काढावे व आ सावंत यांच्या विरोधात बोलावे, असे आव्हान देल आ राणाजगजितसिंह पाटील व भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके व राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य अविनाश खापे यानी संयुक्तपणे दि.१६ फेब्रुवारी रोजी घणाघात केला, शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी युवा सेनेचे जिल्हा सरचिटणीस नितीन घोडके, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख तथा मराठवाडा सहकार सचिव शमशोद्दीन शेख, महिला जिल्हाप्रमुख भारती गायकवाड, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष आनंद भक्ते, युवा सेनेचे परंडा तालुका संघटक विशाल देवकर, पंचायत समितीचे माजी उपसभापती मेघराज पाटील, राजाभाऊ कोळी व मनोज मोटे आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठी घराणेशाही ऐवजी सर्वसामान्य कुटुबातील महिलेला बसवावे अशी आमची मागणी आहे. मात्र, पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या अर्चनालाई पाटील यांना

अध्यक्ष करा असा आदेश आमदार सावंत यांना दिला तर आमची काहीही अडचण नसल्याचे त्यांनी सांगितले, तसेच भूम, परंडा व वाशी या मतदारसंघात भाजपचे अस्तित्व नाही. त्यामुळे आ सावंत यांनी ८ उमेदवार निवडून आणले आहेत. मात्र, भाजपच्या कार्यकत्यांच्या भावना दुखावल्या असा आवाहनित आमदार सावंत यांना विनाकारण बदनाम करण्याचे षडयंत्र थांबवावे असे सांगत त्यांनी निषेध व्यक्त केला, तर अविनाश खाते म्हणाले की, जिल्ह्यात आता भाजप शिल्लक आहे की नाही? हे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी सांगावे, असे आव्हान देत ते म्हणाले की, जसा शिवशेनेवर अन्याय होत

आहे तसा भाजपवर देखील अन्याय होत आहे. तुम्ही भाजप मल्हार पाटलाच्या दावणीला बांधायचे काम करू नका असा टोलाही त्यांनी लगावला, तसेच निवडणुकीपूर्वी शिवसेनेच्यावतीने सर्वे केला होता. त्यामध्ये शिवसेनेचे २१ व संभाव्य ४ असे २५ उमेदवार निवडून येणार असल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे महायुती म्हणून सन्मानपूर्वक जागावाटप झाल्या असत्या तर जिल्हा परिषदेच्या २१ जागा शिवसेनेच्या निवडून आल्या असत्या व जिल्हा परिषदेची सत्ता शिवसेनेच्या ताब्यात आली असती. शिवसेना संपर्कप्रमुख हा लढाऊ असावा लागतो. मात्र जिल्हा संपर्कप्रमुख शिवसैनिकासारखा लढणारा नाही, त्यांना फक्त बुजगावणे बनवले असल्याचा आरोपी त्यांनी केला. भाजप जिल्हाध्यक्ष कुलकर्णी व माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे हे स्वतंत्र विचाराचे आहेत, मात्र भाजपमध्ये पक्ष संघटनेला कुठलाही अर्थ राहिलेला नाही. कारण माझी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, राहुल पाटील यांच्या घरातील उमेदवारांना पाडण्याचे काम भाजप अंतर्गत फळीने केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी मंत्री बसवराज पाटील यांनी भाजपच्या आमदार व खासदार यांच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला निवडणुकीचे तिकीट द्यायचे नाही असे सांगितलेले असताना देखील आमदार राणा पाटील यांच्या घरात तिकीट दिले असल्याचा आरोपी त्यांनी केला. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आमचे दोन पळून नेलेले सदस्य आमच्या स्वाधीन करा. अन्यथा आम्ही देखील लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरणार असल्याचा गर्भित इशारा खापे यांनी दिला.

# न.प. तील त्या ‘कानफुके रील स्टार’ सभापतींची इतर विभागांत ढवळाढवळ?

## महिलांच्या मुलभूत सुविधेकडे दुर्लक्ष !

धाराशिव (प्रतिनिधी)– महिला सन्मान आणि सुरक्षिततेच्या घोषणा देत सत्तेत आलेल्या धाराशिव नगर परिषद मध्येच महिलांना मूलभूत स्वच्छतागृहासाठी धावपळ करावी लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नगर परिषदेत तब्बल ४१ नगरसेवक असून सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे बहुमत आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी पक्षाच्या ११ महिला नगरसेविका विजयी झालेल्या असून नगराध्यक्षपदी देखील महिला आहेत. तरीही नगर परिषद इमारतीत महिलांसाठी सुलभआणि स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. त्यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

दररोज विविध कामांसाठी शेकडो महिला नगर परिषदेत येतात. परंतू शौचालयची गरज भासल्यास त्यांना सुविधा उपलब्ध होत नाही. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार स्वच्छता समितीच्या कार्यालयाशेजारील एका कोपऱ्यातील खोलीत स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे. मात्र ते ठिकाण अडवळणी असून कोणतेही दिशादर्शक फलक नाहीत. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या महिलांना ती जागा सापडतच नाही. दरम्यान, नगर परिषदेत इतर विभागांमध्ये हस्तक्षेप करणारे आणि नगराध्यक्ष आणि अधिकारी यांच्या कानात कुजबुज करून वातावरण दूषित करणारे म्हणून ओळखले जाणारे ’कानफुके रील स्टार’ सभापती चौथ्या स्तंभावर आक्षेप घेण्यात पुढे असल्याची चर्चा जोरदारपणे सुरू आहे. मात्र महिलांच्या स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या प्रश्नावर त्यांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येत नसल्याचा सूर महिला वर्गातून निघत आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा केवळ सभे पुरत्याच मर्यादित राहणार का ? बहुमताची सत्ता असतानाही महिलांसाठी मूलभूत सुविधा का उपलब्ध करून दिल्या जात नाहीत ? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.




नगर परिषद प्रशासनाने तातडीने स्पष्ट दिशादर्शक फलक लावून स्वच्छतागृह सर्वसामान्य महिलांसाठी खुले करावे. केवळ कर्मचाऱ्यांसाठी मर्यादित न ठेवता बाहेरील महिलांनाही सुविधा द्यावी, अशी मागणी होत असून ती रास्त देखील आहे. महिला प्रतिनिधित्वाचा अभिमान मिरवणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आता घोषणांपेक्षा कृतीतून संवेदनशीलता दाखविण्याची गरज असल्याचे मत सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे स्वच्छता विभागाच्या मंडळींनी याकडे गांभीर्याने पाहून ती सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्यावी अशी मागणी होऊ लागली आहे.

# विद्यार्थ्यांनी शिवरायांचा आदर्श घेवून सर्वांगीण विकास साधावा: डॉ.इंद्र मणि

## कृषि महाविद्यालय, लातूर शिवजयंती महोत्सवात सांस्कृतिक स्पर्धेला प्रारंभ



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : कृषि महाविद्यालय, लातूर मध्ये प्रतिवर्षी श्री.छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येतो. या महोत्सवात विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. दि: १४/०२/२०२६ रोजी आयोजित सांस्कृतिक स्पर्धे च्या उद्घाटनाकरिता अध्यक्ष म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा.प्रा. डॉ.इंद्र मणि लाभले तर प्रमुख अतिथी म्हणून जागतिक ख्यातीचे वनस्पती पैदासकार डॉ.नागेन्द्रकुमार सिंग, संचालक शिक्षण डॉ.भगवान आसेवार, कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, डॉ.दिनेशसिंह चौहान, डॉ. अच्युत भरोसे, डॉ. संतोष कांबळे, डॉ.मोहन धुप्पे, डॉ.व्यंकट जगताप, डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अशोक घोटमोकळे व डॉ.विजय भामरे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलन व छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पूजनाने झाले. यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ. इंद्र मणि म्हणाले शिवरायांच्या विचारांचा वारसा आपल्याला लाभलाय म्हणून ही भूमी पवित्र आहे. शिवरायांनी मोजक्याच साधनामध्ये स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी आहे त्या संधीचा सुयोग्य वापर करून अनेक नवनवीन संधी निर्माण केल्या. आज तुमच्यासमोर अनेक नवनवीन क्षेत्रात संधी उपलब्ध होत आहेत. कृषि महाविद्यालय, लातूरचा परिसर हा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी पोषक असून हा विभाग माझ्या सदैव पसंतीचा आहे अशी शाबासकीची थाप देवून विद्यार्थ्यांनी योग्य शिक्षण आणि शिवरायांचा आदर्श घेवून कुठल्याही क्षेत्रात जाऊन संधीचे सोने करून सर्वांगीण विकास साधावा असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी डॉ.भगवान आसेवार म्हणाले विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शारीरिक व मानसिक विकासासाठी सांस्कृतिक स्पर्धांचा मोलाचा वाटा आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अध्यायनासोबतच सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्याकरिता विविध स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे.

यानंतर बहारदार गायन, शास्त्रीय, पाश्चात्य नृत्य, भारताच्या विविध प्रदेशांच्या लोकनृत्यसादरीकरणाने उपस्थितांची माने जिंकली. मान्यवरांच्या हस्ते कृषि महाविद्यालयाच्या विजेत्या स्पर्धकांना चषक, पदक व प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील शासकीय व बँक सेवेत निवड झालेले गुणवंत विद्यार्थी सुहास सोन्ने, कृष्णा गायकवाड, तुषार साळवे, शुभम गटकल, आशिष बिराजदार यांचा तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परीसंवादांमध्ये पुरस्कारप्राप्त सिद्धी देसाई, प्रतीक्षा खेडकर, सुशांत बिराजदार, कृष्णा देशमुख, मयूर मोरे, गौरव पाटील, नागेश वाघ, यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी तर सूत्रसंचालन निर्भय त्रिपाठी व वेदश्री पाठक यांनी तर आभार डॉ.विजय भामरे यांनी मानले. कृषि महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्याने सांस्कृतिक महोत्सव यशस्वीरित्या संपन्न झाला.

# बहुजन विकास अभियानाच्या वतीने डॉ.दीपक सोमवंशी यांचा सत्कार

**दै. अदिती एक्सप्रेस**
(पाटील जयप्रकाश)

उदगीर प्रतिनिधी – बहुजन विकास अभियानच्या वतीने उदगीर तालुक्यातील निडेबन जिल्हा परिषद मतदार संघातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. दिपक सोमवंशी यांचा जाहीर सत्कार करून, त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी बहुजन विकास अभियान प्रमुख संजय कुमार यांनी सांगितले की, डॉ. साहेब आता तुम्ही सर्वांचे लोकप्रतिनिधी आहात, सर्वांचेच कामे तुम्हाला करावे लागतील, आता तुमच्यावर डबल भूमिका पार पाडण्याची जबाबदारी मतदार संघाचे लोकांनी टाकली आहे, त्या दोन्ही जबाबदाऱ्या अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दोन्ही जबाबदाऱ्यातून आपणाला काम करत असताना अनेक संकटाला समोर जावे लागले तरी आपण ते घेतलेला वसा सोडू नका, सत्कार करतेवेळी अभियान प्रमुख संजय कुमार यांनी सांगितले. सत्कार प्रसंगी बहुजन विकास अभियानाचे संघटक मानसिंग पवार, अमोल सूर्यवंशी ,गोविंद साळुंखे, मनोज सोनकांबळे ,यावर खान, अक्षय सावंत, रावण भोसले, सुनील पाटील, गंगाधर शेवाळे ,राजकुमार आप्पा, कारभारी स्वप्नील गायकवाड, गोरख वाघमारे ,अभय मारकवार श्रीनिवासकर जकनाळकर आदीसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवा निमित्त महावितरणचे महारक्तदान शिबीराचे आयोजन

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर, – शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने महावितरणच्या संयुक्त शिवजयंती सिमतीच्या वतीने दरवर्षी विविध समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात ही गौरवाची बाब असून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगत या उपक्रमात सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्सफूर्त सहभाग घेत समाजिक जाणीव जोपासावी असे विचार मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.

महावितरणच्या लघूप्रशिक्षण सभागृहात पार पडलेल्या महारक्तदान शिबीरात ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे, मानव संसाधन विभागाचे सहाय्यक महाव्यवस्थापक चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता शैलेश पाटील, धनंजय जाधव, प्रमोद दुधाळे उपकार्यकारी अभियंता श्रीशैल्य लोहारे यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडलेल्या महारक्तदान शिबीरात श्री बुलबुले पुढे म्हणाले की, शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने राबविला जाणारा हा उपक्रम खरोखरच कौतूकास्पद आहे. घरोघरी विजेच्या माध्यमातून प्रकाश पोहचवणारे हात रक्तदानासारख्या कामीही हिरीरिने पुढे येत सामाजिक बांधिलकी जोपासत असल्याचा अभिमान आहे असे कौतूकोउदगार काढले.

स्वराज्य म्हणजे गोरगरिबांच्या, उपेक्षितांच्या , शोषितांच्या उद्धारासाठी छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले लोककल्याणकारी राज्य आणि हाच संदेश घेऊन शिवरायांना अनोख्या पद्धतीने मानवंदना द्यावी या हेतूने मंगळवारी (दि.१७ ) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे संयोजक सहाय्यक अभियंता राहूल गाडे यांनी सांगीतले. सदर शिबिरास महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. यावेळी ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सुपूर्द करण्यात आले.



# गजानन भोपणीकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य सत्कार संपन्न

**दै. अदिती एक्सप्रेस**

देवणी : बोरोळ पंचायत समिती मतदार संघात बहुमताने निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमदेवार श्री गजानन भोपणीकर यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युवक प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मा. तालुकाध्यक्ष तथा देवणी नगर पंचायतीचे नगरसेवक उपस्थित होते तेव्हा सत्कार प्रसंगी बोलताना मनोज कन्नाडे सर म्हणाले की काम करत आलोय काम करीत राहू या स्व. अजितदादाच्या विकासात्मक दृष्टीकोनाला सर्वसामान्य माणसापर्यत पोहचविण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्त्याची आहे असेही मनोज कन्नाडे यांनी सांगितले. या प्रसंगी सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे सर, देवणी नगर पंचायतीचे नगरसेवक डॉ. प्रा. अनिल इंगोले सर,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अनिल भाऊ कांबळे ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा युवक उपाध्यक्ष जितेंद्र शिवगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओ. बी.सी.सेलचे अध्यक्ष दत्ता चाळकापुरे, शहराध्यक्ष प्रितम आष्टुरे, कार्याध्यक्ष अजय भोळे, बोरोळ शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड , सत्यवान बालुरे सह अदिंची उपस्थिती होती.

# शिरसीच्या श्री विठ्ठल मंदिरास पालखीची भेट

**दै. अदिती एक्सप्रेस**

**कासार शिरसी, दि.१७-** येथील कारागीर धोंडीराम मारुती गरंडे यांनी सागवान लाकडाची रेखीव पालखी बनवून येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात समर्पित केली आहे.

या पालखीस जवळपास दीड लाख रुपये खर्च आला असून यासाठी राम लक्ष्मण बंडगर, धनराज होळकुंदे आणि विष्णुपंत काळे यांनी आपले योगदान दिले आहे. सदरची पालखी येणाऱ्या मार्च महिन्यात अखंड हरिनाम सप्ताहात लोकार्पित करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर कृती समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

# उदगीर येथील बसस्थानक पुर्नबांधणी कामासाठी ३ कोटी ५० लक्ष रुपयाचा निधी मंजूर

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांची माहिती

**दै. अदिती एक्सप्रेस**
**(जयप्रकाश पाटील)**

उदगीर प्रतिनिधी – उदगीर शहरात गेल्या वर्षभरापासून अत्याधुनिक बस स्थानकाचे काम सुरू असून यामध्ये राहिलेल्या सुविधा व उदगीर व जळकोट मतदार संघात ये – जा करणाऱ्या महामंडळाच्या एस.टी. बसेसची कमतरता आदीसह राहिलेले उर्वरित प्रश्न तात्काळ सोडून उदगीर व जळकोट मतदार संघातील प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी माजी मंत्री तथा उदगीर जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मंत्रालयात भेट घेऊन केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असुन उदगीर येथील बसस्थानक पुर्नबांधणी कामासाठी ३ कोटी ५० लक्ष रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी दिली आहे.



उदगीर मतदार संघ हा तीन राज्याच्या सीमेवर असल्याने येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

या निधीमुळे उदगीर येथील बसस्थानकाचे काम लवकर होवून प्रवाशांच्या सेवेत अत्याधुनिक बसस्थानक निर्माण होणार आहे. यामुळे विद्यार्थी व नागरिकांची सोय होईल असा विश्वास आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

याचबरोबर महामंडळाच्या उपलब्ध असणाऱ्या बसेस ह्या कमी पडत आहेत तर काही बसेस नादुरुस्त व काही मोडकळीस आले असल्याने या भागातील प्रवाशांना प्रवास करताना अडचण निर्माण होत आहे. उदगीर व जळकोट शहरात बस स्थानकाचे काम सुरू असून त्या कामाचा आढावा घेऊन राहिलेले उर्वरित प्रश्न सोडवणार असल्याचेही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

उदगीर बसस्थानकाला निधी मंजूर केल्याबद्दल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आ.संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत तर उदगीर बसस्थानकाला निधी मंजूर करुन घेतल्याबद्दल आ.संजय बनसोडे यांचे उदगीर मतदार संघातील जनतेने अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत.

# दक्षिणमुखी शिव पिंडीस १०१ लिटर दुधाचा महिला कडून दुग्ध अभिषेक

लातुर / प्रतिनिधी– येथील चौदाघर मठ महिला भजनी मंडळ यांच्या कडुन श्री संत शिवयोगी झिंगणप्पा सिद्धमलप्पा स्वामी महाराज यांच्या दक्षिणमुखी शिव पिंडीस १०१ लिटर दुधाचा सामुहिक महिला कडुन महाशिवरात्र निमित्त दुग्ध अभिषेक करण्यात आला.

चोदाघर्मठातुन झिंगणप्पा गल्ली ,जुनि सराफ गल्ली, राचट्टे गल्ली व चौदाघर मठ परिसरातील महिलांनी कळव मिरवणुकीत सहभाग नोंदविला. ताल मृदुंगाच्या गजरात हाती पताके घेऊन सहभागी झाले. हि मिरवणुक रात्री ११.०० वा.चौदाघर मठातुन निघुन हालकीच्या कडकडात फटाके च्या अतिष बाजीत औसा हनुमान, पोस्ट ऑफिस, सिद्धार्थ कॉलनी , झिंगणप्पा चौक मार्गे झिंगणप्पा मठात मिरवणुक आली.



श्री झिगंनाप्पा शिवपिंडेस राणी चंद्रकांत बावगे या दम्पतंय हस्ते शिवपिंड पूजा केली व माहिलानी पिडीवर धूद च्या अभिषेकाला प्रारा रभ करणयातआला नंतर सर्व कळशी घेतलेल्या महिला अनिता तिवारी लता गायकवाड अनुराधा गायकवाड गायत्री मठपती साधना माने वर्षा पुदालें बबीता स्वामी अनिता बावगे शांताबाई बावगे चंद्रकला साळुंखे मीना स्वामी राणी बावगे सुमन राऊत ज्योती मेंगशेट्टी निर्मला मीनशेट्टे सुजाता स्वामी काय नाव कलावती बावगे सोनाली बावगे श्रीदेवी बावगे अर्चना गायकवाड सुवर्णा दाणे कोमल पवार लता पवार या महिलांनी डोक्यावर कळशी घेऊन सहभाग नोंदवला. प्रभागाच्या नूतन नगरसेविका श्रावणी बालाजी झिपरे व समस्त झिपरे परिवार प्रामुख्याने सहभाग नोंदवला चौदाघर मठ महिला भजनी मंडळ हाती झेंडा व टाळ घेऊन सुशीला कलेमले शिवगंगा कंगले कुसुम पुदा ले शकुंतला बावगे शिवकांता स्वामी सुनिता स्वामी मीना स्वामी रेणुका स्वामी ललिता बिडवे शैला मठपती जयश्री स्वामी कविता स्वामी दैवशाला हलके छाया चिवटे आदीसह अनेक महिला भजनी मंडळात सहभागी होते .

या मिरवणुकीत सहभागी असलेले चौदाघर मठ देवस्थानचे विश्वस्त श्रीशैल्य सिद्धेश्वरे दत्ता स्वामी बस पुरे विजय स्वामी बसपुरे शिवरुद्र कंगले चंदू बावगे मनमत बिडवे सोमनाथ स्वामी सोमनाथ बावगे पुजारी दत्ता स्वामी आकाश गवळी पप्पू बोराळे आकाश खुबा वैभव चोळखणे मनमत चोळखणे यांच्यासह अनेक पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित सोबत आप्पा गणेश मंडळाचे युवक नागेश बावगे मंदार प्रयाग पृथ्वीराज चंदनगिरे नागेश स्वामी विजय मठपती शिवम मठपती प्रसाद बिडवे या युवकासोबत अनेक बाल गोपाल या कलश मिरवणुकीत सहभागी झाली होती.

# जुन्या पेन्शन योजनेसाठी कर्मचारी संघटनेचा असहकार आंदोलन

## कर्मचारी संघटनेने बेमुदत काम बंद आंदोलनाचा दिला इशारा



**दै. अदिती एक्सप्रेस**
**(जयप्रकाश पाटील )**

उदगीर प्रतिनिधी – प्रशासनाच्या सर्व विभागातील लिपीकांना जुनी पेन्शन योजना व विविध मागण्यांसाठी जयमहाराष्ट्र शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने असहकार आंदोलन करण्यात येत असल्याचे निवेदन सोमवारी (१६ फेब्रुवारी) उपविभागीय अधिकारी उदगीर सोमनाथ जाधव व तहसीलदार उदगीर राम बोरगावकर यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या प्रशासनाच्या सर्व विभागातील लिपीक संवर्गाच्या चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे व पदोन्नती स्तर कमी करुन पदनामात बदल करणे तसेच जशास तसे जुनी पेन्शन लागू करणे, व तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनूकंपाच्या प्रतिक्षासुचीवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन लागू करणे आदी मागण्यासाठी शासनाचे लक्ष वेधणेसाठी सनदशीर मार्गाने असहकार आंदोलन करण्यात येत आहे. तरी १६ ते २३ फेब्रुवारी दरम्यान आम्ही लातूर जिल्ह्यातील लिपीक बांधव असहकार आंदोलनात सहभागी होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. निवेदनावर जयमहाराष्ट्र शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मंगेश काळे, उपाध्यक्ष बळीराम केंद्रे, सचिव रोहिदास जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

१६ ते २३ असहकार आंदोलनाची रुपरेषा

१६ व १७ फेब्रुवारी रोजी लिपिक कर्मचारी कार्यालयात येणे, स्वाक्षरी करणे, काळी फित लावून बसून राहणे. १८ फेब्रुवारी रोजी लिपिक कर्मचारी कार्यालयात येणे, स्वाक्षरी करणे व कार्यालय समोर शांततापूर्वक मार्गने प्रलंबित मागण्यासंदर्भात घोषणा देणे २० फेब्रुवारी रोजी लिपिक कर्मचारी कार्यालयात येणे, स्वाक्षरी करणे व दिलेल्या निवदेनाचा पाठपुरावा करणे. २३ फेब्रुवारी पासून बेमुदत संपूर्ण काम बंद आंदोलन.

# लातुरातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणून नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा

## शहर जिल्हा भाजपाची निवेदनाद्वारे पोलिस अधिक्षकांकडे मागणी

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहरात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी घटनांमध्ये मोठ्या प्रमणात वाढ झाल्याचे पहायला मिळत आहे. त्यातच सोमवार दि. १६ रोजी विद्यार्थ्याच्या हत्येची घटना घडली आहे. या घटनेमळे पालक, विद्यार्थी यांच्यासह नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. याची दखल घेत लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने लातुरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणून नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे लातूर जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्याकडे करण्यात आली आहे.





लातूर शहरात सोमवार दि. १६ रोजी विद्यार्थ्याची दुर्दैवी हत्या करण्यात आली आहे. ही घटना अतिशय गंभीर व संतापजनक आहे. गेल्या काही महिन्यापासून लातूर शहरात अनेक गुन्हेगारी घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. याची दखल घेवून लातूर शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वात भाजपाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन दिले आहे.या निवेदनाच्या माध्यमातून विद्यार्थी हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कलमानुसार गुन्हे दाखल करावेत, या गुन्ह्याचा तपास जलदगतीने व पारदर्शक करून दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करावा, शहरातील संवेदनशिल भागांमध्ये पोलिस बंदोबस्त वाढवून नियमित गस्त व प्रतिबंधक कारवाई करावी, गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी कोंबिग ऑपरेशन, शस्त्र तपासणी व संशयितांवर देखरेख वाढवावी. नागरिकांमध्ये विश्वास निर्माण व्हावा यासाठी कारवाईची अधिकृत माहिती वेळोवेळी जाहीर करावी व गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन, शाळा, महाविद्यालय, पालक व सामाजिक संस्थांच्या सहभागातून जनजागृती व प्रतिबंधात्मक मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदन देताना मनपाचे गटनेते ॲड. दीपक मठपती, माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक प्रविण कस्तुरे, नगरसेविका रागिणी यादव, मडलाध्यक्ष सचिन सुरवसे, संतोष पांचाळ, संतोष तिवारी, मंदार कुलकर्णी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.